TIMES OF INDIA - 14 February, 2020

# Cops cuff serial burglar, crack 127 cases

Times News Network

**Pune:** The crime branch of the city police on Thursday claimed that it cracked 127 cases of burglary following the recent arrest of an inter-state criminal.

Police also arrested six others and recovered gold and silver ornaments valued at over Rs37.73 lakh.

The criminal, Munna Qureshi, had residences in Mumbai and Hyderabad, police said.

"The solved cases include 82 from Pune and 45 from Mumbai, Navi Mumbai, Thane, Nashik, Nagpur, Hyderabad, Bengaluru and New Delhi," joint commissioner of police Ravindra Shisve said on Thursday at a press conference, alongside additional commissioner of police Ashok Morale and deputy commissioner of police Bachchan Singh.

Qureshi was previously arrested in 2018 by the Pune police in connection with 36 burglaries. "After he was released on bail, Qureshi frequently travelled to Pune by air or road and committed the burglaries. He would flee to Mumbai or Hyderabad," Shisve said.

He further said Shisve was caught on CCTV cameras on multiple instances, but they were not able to trace his whereabouts. "He constantly changed his aliases and address to evade capture," Shisve said.

Qureshi's luck ran out on January 21, when he landed in police custody. Following a few leads, a police team led by senior crime branch inspector Datta Chavan intercepted Qureshi's car near Sanjay Park in Vimannagar and arrested him.

"A search of his car led to the seizure of weapons used in the burglaries. Qureshi admitted his involvement in the burglaries under questioning, and also named a local accomplice, Ishwar Shindewal, alias Chintya," Shisve said.

Shindewal was among the six others arrested. The other five men — Sharif Shaikh, Ashok Pradhan, Abdul Sattar, Moghul Anwarali Baig, Prabhu Nanjwade — helped Qureshi sell the loot. Police recovered 830gm of gold and 6.3kg of silver from them.

Qureshi has cases registered against him at 24 of the 31 police stations in Pune, Shisve said.

"As per the investigation, Qureshi — with help from Shindewal — would conduct a recce of housing societies in his car. He then struck at locked flats, mostly at night, while Shindewal kept a watch outside," Shisve said, elaborating on how Qureshi operated. "Qureshi would take help from his friends and relatives in Hyderabad to sell the loot," he added.


Pune police commissioner K Venkatesham has announced a reward of Rs25,000 to the policemen involved in the arrest.

## PROLIFIC PILFERER

- Munna Qureshi operates under two other aliases – Salim Ali Hussain Khan and Mohammad Hamid Habib Qureshi
- He has residences in Mumbai and Hyderabad
- In 2018, the Pune police had arrested him in connection with **36 burglaries**
- Magisterial courts have issued non-bailable warrants against him

## OTHER LINK

- Police are probing the role of a constable in the crimes
- Cops suspect the constable came in contact with Qureshi in 2018
- The constable helped him cover up his crimes in exchange for a share of the loot, police said


Police produce Munna Qureshi before the media on Thursday

महाराष्ट्र टाइम्स – दि. २२ फेब्रुवारी, २०२०

# माथाडीच्या नावाखाली खंडणी मागणाऱ्यांना अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

माथाडीच्या नावाखाली एका मालवाहतूक करणाऱ्या व्यक्तीला खंडणी मागणाऱ्या पाच जणांना खंडणीविरोधी पथकाने अटक केली आहे. या आरोपींना कोर्टाने तीन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

जितेंद्र लक्ष्मण गुप्ते (वय ३२), अक्षय उत्तम गायकवाड (वय २७), अक्षय नंदू नडगेरी (वय २२), आकाश श्रीमंत बनसोडे (वय २४), शुभम शशिकांत बिळगीकर (वय २२, सर्व रा. डायस प्लॉट झोपडपट्टी, गुलटेकडी) अशी अटक करण्यात आलेल्या पाच जणांची नावे आहेत. याबाबत सैफउद्दीन कुदबुद्दीन टिनवाला (वय ३५, रा. टिळेकरनगर, कोंढवा) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. शंकरशेठ रस्त्यावरील ढोले पाटील चौकाजवळील नेहरू रस्त्यावर गुरुवारी सायंकाळी पाच वाजता हा प्रकार घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टिनवाला मालवाहतुकीच्या एका कंपनीत मॅनेजर म्हणून काम करतात. गुरुवारी सायंकाळी ते पाचच्या सुमारास ढोलेपाटील चौकातील मेनका डिस्ट्रिब्युटर्स येथे मालाच्या 'डिलिव्हरी'साठी चारचाकी गाडी घेऊन आले होते. त्या वेळी आरोपींनी माथाडी कामगारांच्या नावाखाली मालाची वाहतूक करणारा टेम्पो अडवला. पैसे मागून, जीवे मारण्याची धमकी दिली.

खंडणीविरोधी पथकाच्या तपासानुसार आरोपींनी खंडणी मागितल्याचे निदर्शनास आले. आरोपींच्या ताब्यातून मोबाइल, १६ हजार ३०५ रुपयांची रोकड व एका व्यक्तीच्या नावे असलेले माथाडी अँड जनरल कामगार युनियनचे ओळखपत्र असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. यातील आरोपी गुप्ते व गायकवाड दोघेही पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. पाच जणांना तीन दिवस पोलिस कोठडी सुनावली. गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चनसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक राजेंद्र मोहिते यांनी ही कारवाई केली.

लोकमत – दि. २४ फेब्रुवारी, २०२०

# वेश्या व्यवसायातील २ महिलांची सुटका

पुणे : पश्चिम बंगालमधून आणून येथे जबरदस्तीने वेश्या व्यवसायाला लावलेल्या २ महिलांची पुणे पोलिसांनी बुधवार पेठेत कोम्बिंग ऑपरेशन लावून शोध घेतला. त्यातील २ महिलांची सुटका केली असून तिघा आरोपीला अटक करण्यात आली आहे.

पश्चिम बंगालमध्ये पिटा ॲक्टखाली दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी व हरविलेल्या महिला पुण्यात असल्याची माहिती मिळाल्याने पश्चिम बंगालचे पोलीस पुण्यात आले होते.

अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चनसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेने शनिवारी रात्री कोम्बिंग ऑपरेशन घेतले होते. त्यात बुधवार पेठेतील नवीन व जुनी सागर बिल्डिंग येथे जाऊन तपासणी करण्यात आली. त्यात ३ महिला आरोपी पोलिसांना आढळून आल्या.

त्यांना पुढील कारवाईसाठी पश्चिम बंगाल पोलिसांच्या हवाली करण्यात आले. तसेच, जुनी सागर बिल्डिंगमध्ये केलेल्या कारवाई १ पुरुष व २ महिला आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध पिटा ॲक्टनुसार कारवाई करुन दोन मुलींची सुटका करण्यात आली आहे.

लोकमत – दि. २६ फेब्रुवारी, २०२०

# दुचाकीचालकाने भरला ४२ हजार ३00 रुपये दंड

## सर्वाधिक १०८ वेळा केला होता वाहतूक नियमांचा भंग

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे शहर पोलिसांनी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केलेल्या 'टॉप १००' वाहनचालकांची यादी जाहीर केली होती. त्यात एका वाहनचालकाने सर्वाधिक १०८ वेळा नियमभंग केला होता. जास्तीत जास्त वाहतुकीचा नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांना दंडाची रक्कम भरण्याचे आवाहन पोलिसांनी केले होते. मंगळवारी या टॉप १०० मधील एका दुचाकीचालकाने त्याच्यावरील ४२ हजार ३०० रुपयांच्या दंडाची तडजोड रक्कम जमा केली.

वाहतूक शाखेने वाहतूक नियमांचे उल्लंघन केलेल्या टॉप १०० वाहनचालकांची यादी १२ फेब्रुवारी रोजी जाहीर केली होती. या वाहनचालकांचा शोध घेऊन त्यांच्यावरील अनपेड चलन पेड करण्यासाठी विशेष मोहीम सुरु केली आहे. या मोहिमेत आज एका दुचाकी मोपेड चालकाने सर्वाधिक १०८ वेळा वाहतूक नियमांचे उल्लंघन केले होते. त्यांच्याकडून तब्बल ४२ हजार ३०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. २४ फेब्रुवारी रोजी १० वाहनचालकांनी १ लाख २९ हजार ९०० रुपये दंड भरला आहे. त्यात ६५ वेळा नियमभंग केलेल्या एका चारचाकी धारकाने २३ हजार २०० रुपयांचा दंड भरला आहे.

### घरी जाऊन दंडवसुली

ज्या वाहनचालकांनी जास्तीत जास्त वाहतूक नियमांचा भंग केला असून, त्यांनी अद्याप या केसची दखल न घेऊन त्याचा दंड भरला नाही, त्यांच्या राहत्या घराच्या पत्त्यावर पोलीस जाऊन त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई प्रक्रियेचा अवलंब करुन दंड वसूल करण्यात येणार आहे, असे पोलीस उपायुक्त प्रसाद अक्कानवरु यांनी सांगितले.

Pune Mirror - 11 February, 2020

# 2 arrested from Rescue Foundation for drunk ruckus in Budhwar Peth

**NGO working to rehabilitate trafficking survivors claims false case against their employees, says it was due to some miscommunication**





FILE PHOTO

Chavan and Durani (L, facing camera) were allegedly roaming around the red light area (above) on Saturday night drunk, and abusing people, a team of Faraskhana police claimed

Archana.More@timesgroup.com
TWEET @Archana_Mirror

In a potentially serious blot on the reputation of the Rescue Foundation — a non-governmental organisation (NGO) whose work to protect the human rights of trafficked survivors is widely known — two of its investigating officers were booked by Faraskhana police this weekend for allegedly creating a drunk ruckus in the red light area of Budhwar Peth.

However, the NGO has asserted that this is a false case and a misunderstanding about the staffer's actions on part of the police.

After the row around 10.30 pm on Saturday, the duo was identified as Anil Chavan (43) and Manoj Durani (43), both residents of Mumbai.

They were spotted when a squad from Faraskhana police station (PS) was patrolling the red-light area, and claimed to receive a tip-off that two men were suspiciously roaming around and into buildings where commercial sex workers (CSWs) reside. The squad said it saw Chavan and Durani creating a ruckus near the Shanta building — the duo was allegedly screaming, abusing and intimidating the gathered crowd. Police said they managed to control the situation and asked people to leave.

The cops reportedly found the duo to be inebriated and unable to answer questions properly. They were taken to Sassoon hospital, where the two tested positive for alcohol consumption.

On interrogation, Chavan and Durani refused to respond; after saying they work with Rescue Foundation, they allegedly refused to show their ID cards and abused the cops instead, threatening that they would file complaints against them with senior police officers.

Senior police inspector Jagannath Kalaskar of Faraskhana PS told *Mirror*, "As per procedures, volunteers of any NGO have to inform local police before conducting any raid in that jurisdiction. In this case, the Rescue Foundation employees did not inform us and went to Budhwar Peth. When our constable asked them to show their ID cards, they refused. Instead of cooperating, they started arguing. They were under the influence of alcohol and pretending to be on duty, which is a serious matter."

Police registered a first information report (FIR) against the duo under section 85 of the Bombay Prohibition Act, which lays down a penalty for drunkenness and disorderly behaviour under the influence of alcohol in a public place.

Rescue Foundation works in the sphere of rehabilitation of human trafficking survivors, and claims to have rescued over 5,000 girls and reintegrated many more into mainstream society since 2005. Refuting the claims made against their staff, NGO superintendent Shiny Padiyara said, "The duo are our investigation officers and were working in the area. They did not create any ruckus. Cops have filed a false case against them." Advocate Sumedh Deshpande, who represents the Foundation, told *Mirror*, "There was some miscommunication between the police and our investigation officers. We had received a tip-off that some minor girls are missing from West Bengal. When we receive such information, our officers work on it and try to verify the facts. The duo was just trying to do the same by visiting the red light area. Some people involved in trafficking might have sources there and may have misled the cops with false information. We are enquiring into the matter and do not know on what basis police lodged an FIR against the two."

Projecting an increased crime rate around Budhwar Peth last year, Faraskhana police had increased preventive actions like nakabandi, combing operations, raids, day and night patrolling, etc. They claimed this helped keep check on criminal activities like sexual harassment, pick-pocketing, robbery and street fights, all of which came down. A few incidents of assault, attempt to murder and murder were also reported in the area last year. However, several CSWs had cried persecution on the back of this drive, with many choosing to move out of the area in the face of allegedly overzealous policing.

TIMES OF INDIA - 8 February, 2020

# Three arrested for vandalism, police look for 2 others

Asseem.Shaikh
@timesgroup.com

**Pune:** Three of the five men who vandalized a private hospital at Ashirwad Chowk in Kondhwa on Wednesday night were arrested by the Kondhwa police on Friday.

Those arrested were Tousif Shaikh (24), Sohail Qureshi (23) and Mehboob Shaikh (24) from Shivnerinagar. They will remain in police custody till February 10. They work as a driver, a car painter and a fitter, respectively.

Five men had vandalised Welfare Hospital and abused its staff after a dispute over issuing a cause of death letter for a 17-year-old boy.

Inspector Mahadeo Kumbhar (crime) from Kondhwa police station said, "The CCTV cameras installed at the hospital captured the images of the vandals. The police established the identity of the three suspects and arrested them. The suspects are friends of the 17-year-old's brother. Investigations have revealed that they had vandalized the hospital and attacked its doctor and staff. We are questioning them to identity their individual roles in the attack. The incident has to be investigated because it is a social offence."

Their custodial interrogation will help identify the two suspects who are on the run. A police team has been sent to arrest them. Those already arrested will be questioned about the the involvement of the others, he added.


An offence of rioting among other charges of the Indian Penal Code and Maharashtra Medical Service Person and Medical Sevice Institution (Prevention of Violence and Damage or Loss to Property) was registered on an FIR lodged by the hospital's director Sadique Khan.

The 17-year-old's parents had admitted him in the hospital on Tuesday night. On Wednesday, the doctor told the boy's parents to shift him to another hospital because his condition was not improving. The parents got his discharge and took him to two hospitals which refused to admit him. The patient then passed away on way to Sassoon General Hospital.

सामना – दि. १२ फेब्रुवारी, २०२०

# तस्कराकडून तीन लाखांचे मांडूळ जप्त

## फरासखाना पोलिसांची कारवाई



पुणे, दि. ११ (प्रतिनिधी) - शहरातील गणेश पेठेत मांडुळाची तस्करी करण्यासाठी आलेल्या एकाला फरासखाना पोलिसांनी जेरबंद केले. त्याच्याकडून तीन लाख रुपये किमतीचे अडीच किलो मांडूळ जप्त करण्यात आले.

अतिश बाळासाहेब हाके (रा. जांभे, ता. मुळशी) असे जेरबंद केलेल्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फरासखाना पोलीस पेट्रोलिंग करीत असताना गणेश पेठेत एकजण मांडुळाची तस्करी करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून अतिशला ताब्यात घेतले. त्याच्याकडील पिशवीची झडती घेतली असता, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तीन लाख रुपये किमतीचे अडीच किलो मांडूळ आढळले.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगन्नाथ कळसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दादा गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर, यशपाल सूर्यवंशी, शंकर कुंभार, अमोल सरडे, विकास बोऱ्हाडे, खुटवड, मयूर भोकरे, महावीर वलटे, अमेय रसाळ, शेख, दळवी यांच्या पथकाने केली.

**पुढारी – दि. ४ फेब्रुवारी, २०२०**

# वाहन तोडफोडप्रकरणी ; तिघांना अटक

## आरोपी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार; दहशत निर्माण करण्याच्या हेतूने सहकारनगरातील वाहनांना लक्ष्य

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सहकारनगर परिसरातील ४५ पेक्षा अधिक वाहनांची तोडफोड केल्याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. यश रामदास उकिरंडे (वय १९, रा. तळजाई वसाहत), सूरज नारायण अडागळे (वय १९, रा. पद्मावती), राजेश ज्ञानेश्वर जाधव (वय २४, रा. फुलाची वाडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तिघेही रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्यांच्यावर शहरातील विविध पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत. तर सूरज अडागळे हा शहरातून तडीपार आहे. तिघांविरुद्ध तोडफोडीसह खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा सहकारनगर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.



वाहनांच्या तोडफोडीच्या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. त्यानंतर आता कारवाईला वेग आला आहे.

पोलिस ठाण्यापासून जेमतेम पाऊण किलोमीटर अंतरावर पहाटे अडीचच्या सुमाराला दुचाकीवरून आलेल्या तीन तरुणांनी लोखंडी रॉडच्या साहाय्याने वाहनांची मोडतोड करण्यास सुरूवात केली. त्यांनी अनेक दुचाकी, दोन रिक्षा, तीन टेम्पोंसह सुमारे ४५ हून अधिक वाहनांची तोडफोड केली. काही वेळातच तोडफोडीचा आवाज ऐकून लोक जमा होऊ लागताच गुन्हेगारांनी पलायन केले. घटनेनंतर संतप्त नागरिकांनी पोलिस ठाण्यात गर्दी केली होती. याबाबत हेमंत राजेंद्र इंगळे (४६, तळजाईमाता वसाहत, सहकार नगर) यांनी फिर्याद दिली होती. आरोपी हे सराईत असून, परिसरात दहशत निर्माण करण्यासाठी त्यांनी दारूच्या नशेत तोडफोड केल्याचे पोलिसांनी सांगितले.

### ‘आम्ही इथले भाई आहोत’ म्हणत रोखले पिस्तूल

फिर्यादींच्या घरासमोर पार्क केलेली वाहने फोडत असताना आवाज आल्यामुळे ते बाहेर आले. दरम्यान, त्यांनी तोडफोड करणाऱ्या तिघांना तुम्ही असे का करता असे विचारले असता, त्यातील एकाने ‘गुपचूप घरात जा. नाही तर इथेच खल्लास करून टाकीन’ अशी धमकी दिली. तसेच ‘आम्ही इथले भाई आहोत, आमच्या मध्ये कोणी आले तर त्यांना मारून टाकू’, असे म्हणत वाहनांची तोडफोड करून दहशत निर्माण केली.

Pune Mirror - 8 February, 2020

# Cops crack down on vehicles with special no. plates

## As part of drive, a special team tracks down an offender in Hinjawadi and gets him to change it after receiving a complaint on Twitter

Supriya.Dedgaonkar
@timesgroup.com
TWEETS @supriya_mirror

The city traffic department has started a crackdown against vehicles with fancy number plates, which is against the norms.

In one such incident, a special team was deployed in Hinjawadi to nab an offender after receiving a twitter complaint on February 5.

The offender, identified as Sunny Jadhav, had put a number plate on his vehicle which read MH14GYSAI, instead of the actual MH14 GY0591.

The Pune traffic department first received a complaint about Jadhav on their twitter handle by a user. However, since the registration number under Pimpri-Chinchwad jurisdiction, the matter was escalated to them for further action.

However, since no cognisance was taken by their Pimpri-Chinchwad counterparts, the traffic department decided to take the matter in their hands and, with the help of the registration number, they tracked down Jadhav's residence and deployed a team to take action.

As soon as Jadhav got out of his house with the car, he was immediately booked by cops. He was asked to pay the fine which was sent to him in the form of an e-challan and also asked to change the number plate.

Jadhav did what he was told to do without arguing or getting into any kind of tussle with the constables on duty.

Jadhav said, "I admitted that a mistake was made, completed the formalities and got the number plate changed. They tracked me down from Twitter. There was no argument or anything and I obeyed their orders."

Speaking to *Mirror*, police inspector Rajesh Puranik, who works with the traffic police's planning department, said, "Fancy number plates are illegal and we have started acting against the ones who have these number plates on their vehicles. These plates cause inconvenience for officials."

"Our approach is based on reformation and not deterrent theory. We counselled the man and then he changed his mind and the number plate. We are going to track down areas where people with these number plates reside and deploy constables to take action when they get out of their houses," Puranik added.

Police commissioner K Venkatesham said, "As soon as we received the complaint about the number plate, we got on duty to bring about the change. A team led by police inspector Rajesh Puranik was sent to pursue the matter."

In the last one week alone, around 50 people were booked in the city for driving around with fancy number plates.



Sunny Jadhav had put a number plate which read MH14GYSAI

Pune Mirror - 17 February, 2020

# Cops take action against lounges

## For 1st time, cases filed against establishments in Yerawada, Vimantal and Chandan Nagar PS for ignoring notices

Gunwanti Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

For the first time, Pune police have registered cases against bar lounges in the city.

Action was taken with several raids on Saturday night under the guideline of Yerawada divisional assistant commissioner of police. The raids fell under the jurisdiction of Yerawada, Vimantal and Chandan Nagar police stations.

This comes after police had increasingly become frustrated with hotels and bar lounges in the city which allegedly ignored notices issued to them under section 149 of the Code of Criminal Procedure (CrPC). Police sources told *Mirror* that these establishments continued to function as they did despite the notices, while a lot of complaints were filed from residents who lived near them about loud music, and dance performances which are illegal as per the law.

Seven bars and lounges have been booked under section 33a (1) (2) of the Maharashtra Police Act. This section is used for closure of dance bars and carries up to three years in jail and a fine of Rs 2 lakh.

Four establishments in Yerawada, two in Vimantal and one in Chandan Nagar were raided by the cops. During the raid, they found customers drunk and dancing on the floor at some places. Police seized sound equipment.

Ramchandra Desai, ACP, Yerawada division, told *Mirror*, "Any activity which disturbs residents or public in an area, it is crime. We already gave notices to these establishments but they did not follow the law, so we took action. We also found they changed structures without permission from the Pune Municipal Corporation (PMC). As far as serving alcohol, they had permission for a specific area, which they flouted and were serving in areas where they didn't have permission along with loud music. We are only looking at the safety of the customer; we are also investigating if they follow fire safety."

**पुढारी – दि. १७ फेब्रुवारी, २०२०**

# येरवडा परिसरातील हॉटेलवर कारवाई

**चार हॉटेलवरील कारवाईत सात जणांवर गुन्हा दाखल**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दणदणाट करत आवाजाच्या तालावर थिरकायला लावणारे पब, हॉटेलमधील डीजे आता या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांच्या मुळावर उठले आहेत. शहर परिसरात असलेले पब, डान्सबार नियमांची ऐशीतैशी करत रात्री उशिरापर्यंत आवाजाचा गोंगाट करतात. परंतु, या आवाजाला कंटाळून नागरिकांना घर सोडून जाणे भाग पडत असल्याबाबत दैनिक 'पुढारी'ने वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारण्यास पावले उचलली आहेत. त्यानुसार पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत हॉटेल व तेथे चालणाऱ्या डीजेवर कारवाई केली. यामध्ये येरवडा परिसरातील कल्याणीनगर, विमाननगरस्थित चार हॉटेलचा समावेश असून, सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी डीजेचे साहित्यही पोलिसांनी जप्त केले.

पहिल्या गुन्ह्यात ३ फेब्रुवारी कल्याणीनगर येथील मुळीक गार्डन परिसरातील हॉटेल बीबीसीला कमी आवाजात डीजे वाजविण्यास व ठरलेल्या वेळेत डीजे बंद करण्यास सांगितलेले असतानाही त्यांनी पोलिसांनी दिलेल्या नोटिसीचे पालन न केल्यामुळे याप्रकरणी परेश सुनिल सिधवानी (३२, रा. ढोले पाटील रोड, कोणार्क पार्क) आणि विक्रम योगेश वधाणी (४०, रा. लुल्लानगर, कोंढवा) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पोलिस शिपाई सुभाष रामचंद्र पवार यांनी येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या हॉटेलमध्ये आदेशाचा भंग करून परवाना व्यतिरिक्त ओपन टेरेसवर बसलेल्या महिला, पुरुषांना मद्यविक्री करून मनोरंजनासाठी व नृत्य करण्यासाठी विनापरवाना मोठ्या आवाजात जास्त वेळ स्पीकर सुरू असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी तीन ॲम्प्लिफायर, क्रॉसओव्हर, एक मिक्सर आणि दोन साऊंड जप्त असे अडीच लाख रूपये किंमतीचे साहित्य जप्त केले आहे. गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस फौजदार बर्गे करत आहेत.




पुढारी इफेक्ट

कल्याणीनगर मुळीक कॅपिटल येथील 'हॉटेल एफएमएल'ला पोलिसांनी ३० जानेवारी रोजी नोटीस बजावली होती. हॉटेलच्या टेरेसवर विनापरवाना महिला व पुरुषांना मद्यविक्री करून विनापरवाना मोठ्या आवाजात जास्त वेळ स्पीकर चालू ठेवला. स्थानिक नागरिकांना त्रास होईल हे माहीत असतानादेखील स्पीकर चालू ठेवले. प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात हॉटेलचा मॅनेजर सागर हनुमंत भोसले (३०, रा. अस्मिता अपार्टमेंट, साकोरेनगर, विमाननगर) आणि विनीत नावाचा डीजे चालक या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत बाळासाहेब बाबासाहेब बोराटे यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी केलेल्या कारवाईत २ लाख ३० हजार रुपये किमतीचे डीजेचे साहित्य जप्त केले.

कल्याणीनगर येथील फोर्टलिझा कॉम्प्लेक्समधील 'हॉटेल लिजंड्स ऑफ पंजाब' या ठिकाणी मर्यादित वेळेपेक्षा अधिक काळ स्पीकर चालू ठेवल्याप्रकरणी व परवान्याव्यतिरिक्त महिलांना व पुरुषांना टेरेसवर मद्य पुरविल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. या वेळी १५ हजाराचे डीजेचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. व्यवस्थापक सुखमो ईजुंग फन्जोमो ईजुंग (२९, रा. सेंट अर्नोल्ड स्कुल समोर, आदर्शनगर, वडगावशेरी, मूळ रा. नागालँड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस हवालदार यादव गुन्ह्याचा पुढील तपास करत आहे.

कल्याणीनगर येथील मुळीक गार्डन येथील हॉटेलमध्ये विनापरवाना डीजे मोठ्या आवाजात सुरू ठेवून परवान्याव्यतिरिक्त टेरेसवर बसलेल्या नागरिकांना मद्य पुरविल्याप्रकरणी व नोटीस बजावूनही आदेशाचा भंग केल्याप्रकरणी हॉटेलाचा मॅनेजर विनायक रत्नाकर कोठाळे (३७, रा. गणेशनगर, बोपखेल) आणि सद्दाम तहजिब शेख (२३, रा. भाऊ पाटील रोड, बोपोडी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या वेळी ३४ हजारांचे डीजेचे साहित्य जप्त करण्यात आले असून पोलिस हवालदार लोंढे तपास करीत आहेत.

**लोकमत – दि. ३ फेब्रुवारी, २०२०**

# दागिने चोरणारा पेंटर जेरबंद

**पुणे :** घराचे रंगकाम करीत असताना महिलेची नजर चुकवून पावणेदोन लाखांचे दागिने चोरणाठ्या पेंटरला सिंहगड पोलिसांनी जेरबंद केले. ही घटना काल सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास वडगाव बुद्रूकमधील लक्ष्मी स्मृती इमारतीत घडली. विठ्ठल महादेव माने (वय ३५, रा. जंगलवाडी, सातारा ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी नंदा जगदाळे (वय ५२, रा. वडगाव बुद्रूक) यांनी सिंहगड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नंदा गृहिणी असून वडगाव बुद्रुक परिसरातील लक्ष्मी स्मृती इमारतीत राहायला आहे. दोन दिवसांपासून विठ्ठल नंदा यांच्या घराचे रंगकाम करीत होता. शनिवारी सकाळी नंदा घराबाहेर गेल्या असता, विठ्ठलने कपाटातील पावणेदोन लाखांचे दागिने चोरुन पळ काढला.

# अधिकाऱ्याला धक्काबुक्की करणारा जेरबंद

**पुणे :** अनाधिकृत पथारीवाल्यासह फेरीवाल्याविरुद्ध कारवाई करीत असताना सहायक अतिक्रमण अधिकाऱ्याचा मोबाईल हिसकावून त्यांना धक्काबुक्की करणाऱ्यास कोरेगाव पार्क पोलिसांनी जेरबंद केले. ही घटना शनिवारी संध्याकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास रुबी हॉल रुग्णालयालगत घडली. दीपक उर्फ आण्णा गायकवाड (रा. ताडीवाला रस्ता ) असे त्याचे नाव आहे. याप्रकरणी राहूल इचके यांनी कोरेगाव पार्वष्ठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राहूल इचके सहायक अतिक्रमण अधिकारी आहेत.

पुढारी – दि. २० फेब्रुवारी, २०२०

# दोघा मोबाईल चोरट्यांना अटक

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

मारहाण करीत जबरदस्तीने मोबाईल चोरी केल्याप्रकरणी गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने सौरभ संभाजी डोलारे (१८, रा. येरवडा) याच्यासह एका विधिसंघर्षित मुलाला ताब्यात घेतले. एका व्यक्तीला मारहाण करून मोबाईल व पैसे चोरी करणारा व्यक्ती व त्याचा साथीदार रेल्वे स्टेशन परिसरात येणार आहे, अशी माहिती बंडगार्डन गस्तीवर असलेल्या पोलिस कर्मचारी अतुल गायकवाड यांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. आरोपी डोलारे याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने चोरी केल्याचे कबूल केले. या वेळी त्याने चोरी केलेला सात हजार रुपये किमतीचा मोबाईल जप्त केला आहे, तर दुसऱ्या घटनेत लष्कर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असलेल्या मोहसीन शेख यांना बातमी मिळाली, कॉसमॉस बँकेसमोरील



चारचाकी गाडीतून मोबाईल चोरी करणारा व्यक्ती कॅम्प येथील रोझरी शाळेजवळ येणार आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून अमितकुमार श्री धनेषप्रसाद यादव (रा. कॅम्प, मूळ. बनारस, यू. पी.) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबूल केले. या वेळी त्याच्या ताब्यातून ११ हजार रुपये किमतीचा व्हिवो कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. ही कामगिरी वरिष्ठ निरीक्षक महेंद्र जगताप, उपनिरीक्षक नितीन शिंदे कर्मचारी दिनेश गडांकुश, किशोर वग्गू, अस्लमखान पठाण, गोपाल मदने यांच्या पथकाने केली.

TIMES OF INDIA - 6 February, 2020

# Fin firm owner held, charged with duping 148 of ₹34 lakh

**Pune:** The proprietor of a finance company was arrested from his Greater Noida residence on the charge of duping 148 people from the city of over Rs34 lakh on the promise of offering them loan since February 15, 2019.

A cybercrime police team under inspector Santosh Barge took Raoushan Kumar (44) into custody on February 1. He was produced before a local court there on February 2 and then brought to the city on transit police custody remand for conducting investigations. He will remain in police custody till February 8.

Searches at Kumar's residence led to the seizure of a laptop, three cellphone handsets, 10 debit cards, nine chequebooks, two bank passbooks, stamp and documents of people applying for loan.

Kumar was arrested following an FIR registered by Phursungi businessman Gorakh Sapkal (36) with the cybercrime police on October 10, 2019.

Sapkal in his FIR said he was into the business of helping people to get loans from banks and financial firms. He stated that Kumar obtained his cell number from an online service provider and contacted him. Kumar offered him to work as an agent in Pune and induced him to direct clients to the latter in need of loan on a commission basis.

The FIR read Sapkal gave Kumar data of 148 people, including himself, in need of loan. Kumar then asked them to deposit varying charges for seeking loan.

Sapkal later realised that he was tricked after Kumar failed to honour his commitment of disbursing loan to the people. After the aggrieved people started making rounds of his office, he filed the complaint against Kumar.

A cyber police officer said investigations revealed that Kumar had registered his firm but did not open an office. He had created a website in the company's name.

लोकमत – दि. १९ फेब्रुवारी, २०२०

# गावठी कट्टा आणि जिवंत काडतुसासह तरुणाला अटक

## वारजे पोलिसांची धडक कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

कर्वेनगर : वारजे पोलिसांनी एका तरुणाला गावठी कट्टा आणि जिवंत काडतुसासह वारजे स्मशानभूमीजवळ अटक केली. तरुणाच्या हेतूविषयी तपास सुरु असून वारजे पोलीस या तरुणांची कसून चौकशी करत आहेत.

वारजे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी अशोक कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार परशुराम सुरेश काळभोर (वय २३, रा. शिवणे) हा वारजे स्माशानभूमी रस्तावर कमरेला गावठी कट्टा लावून कोणाची तरी वाट पाहत होता. पोलिसांना खबर समजताच त्यांनी तातडीने दखल घेऊन घटनास्थळी जाऊन तरुणाची झाडाझडती घेतली असता त्याचा खिशात एक जिवंत काडतूस आढळून आले.

हा बेकायदेशीर गावठी कट्टा वारजे पोलिसांनी ताब्यात घेतला असून पुढील चौकशी वारजे पोलीस करत आहे. या वेळी गुन्हे विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमृत मराठे, पोलीस निरीक्षक अमोल कदम, पोलीस कॉन्स्टेबल बाळ गायकवाड, संदीप शेलार, अमोल पायगुडे, हनुमंत मासाळ आदी पोलीस उपस्थित होते.

TIMES OF INDIA - 5 February, 2020

# One held on charge of suicide abetment

TIMES NEWS NETWORK

**Pune:** A heated argument over parking space a fortnight ago is suspected to be the trigger behind an autorickshaw driver's suicide.

The deceased, Sunil Ramchandra Bhargade (47) of Santoshnagar in Katraj, was found hanging from a neem tree near Jambhulwadi lake around 2pm on Monday, police said.

The Bharati Vidyapeeth police arrested an autorickshaw driver, Sachin Dattatray Abhangrao (30) of Dattanagar in Ambegaon, and booked his accomplice on Monday night on the charge of abetting Bhargade's suicide.

The police have launched a manhunt for Abhangrao's accomplice, who is also an autorickshaw driver.

Bhargade's daughter lodged a complaint with the police stating that an autorickshaw driver and his friend threatened her father of dire consequences over a parking dispute at the Shaninagar chowk stand in Katraj a fortnight ago.

An officer said Abhangrao and his accomplice had claimed they would kill him and his son if Bhargade refused to remove his autorickshaw from the parking queue.

Bhargade had been visibly stressed since the incident, his family members vouched.

**PuneMirror - 24 February, 2020**

# Man held for conning citizens by falsely asking for milk bills

## He was caught red-handed when a resident verified with dairy owner

Gunwanti.Paraste@timesgroup.com

TWEET @gunwantimirror

Residents of a society on Namdev Road were conned by a 36-year-old man, who would arrive at their door pretending to be the designated person meant to collect their milk bills. It is only when the dairy owner called them to pay the dues that the residents realised that an unknown person was cheating them for a while.



A complaint in this regard was lodged by Trupti Shinde, 41, following which **Siddheshwar Ambare** was nabbed by police with coordination from the citizens.

Police sub-inspector Mohan Jadhav told *Mirror*, "He has conned people like this in many areas. He would target houses at a time where he would find people, especially women, for long hours. He would approach, saying that the milk bills were pending after which they were paid without much enquiry."

After getting a lot of written complaints in this matter, the police asked the citizens to be aware and also said that if a person approached to collect milk bill in such a manner, they were to call the cops immediately.

On February 22, the accused went to the complainant's house asking for the bill. She called the dairy owner confirming if he had sent anybody for the amount, to which he replied negatively. The complainant immediately called the police and reported the accused.

Two police constables from Chaturshringi police station Uday Rakshye and Ajay Gaikwad reached the spot and detained the accused. The police have booked him under Indian Penal Code section 420 for cheating.

**पुढारी – दि. ७ फेब्रुवारी, २०२०**

# खुनाच्या प्रयत्नातील फरार सराईत जेरबंद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

खुनाच्या प्रयत्नातील एका सराइताला गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने अटक केली. भांडणात मध्यस्थी केल्याच्या कारणातून झालेल्या वादात दोन साथीदारांच्या साथीने त्याने तरुणावर कोयत्याने वार केले होते.

रवींद्र ऊर्फ सोन्या ऊर्फ विराज संजय खंडागळे (वय २३, रा. घोरपडे पेठ) असे जेरबंद केलेल्याचे नावे. तो दोन वर्षापासून पोलिसांना तो गुंगारा देत होता. आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्यावर स्वारगेट, बिबवेवाडी, खडक, दत्तवाडी पोलिस ठाण्यातंर्गत विविध गुन्हे दाखल आहेत. ही घटना १७ जानेवारी २०१८ मध्ये पर्वती परिसरात घडली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भांडणात मध्यस्थी केल्याच्या कारणातून रवींद्रने सुरज कांबळेवर १७ जानेवारी २०१८ मध्ये पर्वती परिसरात कोयत्याने वार केला होता. त्यानंतर रवींद्र फरार झाला होता. दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत असताना तो हडपसर परिसरातील महादेव नगरमध्ये मावशीकडे राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी रवींद्रला सापळा रचून ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने दोन साथीदारांच्या मदतीने सुरज कांबळेवर वार केल्याची कबुली दिली. कुख्यात गुंड कुणाल पोळवर गोळीबार करुन खून केल्याप्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात सध्या आरोपी रवींद्र जामिनावर आहे. ही कामगिरी पोलिस निरीक्षक अरुण वायकर, उपनिरीक्षक हनुमंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी अमोल पवार, अजय थोरात, वैभव स्वामी, सुधीर माने, सुभाष पिंगळे यांच्या पथकाने केली.

लोकमत – दि. २८ फेब्रुवारी, २०२०

# दंडाच्या रकमेत थोडे पैसे टाकून आली असती नवी दुचाकी

## सर्वाधिक नियमभंग करणाऱ्या चालकाची भावना

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे / बिबवेवाडी :** वाहतूक पोलिसांनी चालविलेल्या टॉप १०० यादीत सर्वाधिक १०८ वेळा नियमभंग करणाऱ्या बिबवेवाडीतील एका वाहनचालकाने ४२ हजार ३०० रुपयांचा दंड नुकताच भरला. दंडाच्या रकमेत आणखी थोडे पैसे टाकले असते तर नवीन दुचाकी घेता आली असती. आपल्याला गेल्या काही महिन्यांपासून मोबाईलवर मेसेज येत होते. परंतु, त्याकडे दुर्लक्ष केले होते. पण आता यापुढे काळजी घेणार असल्याचे या वाहनचालकाने सांगितले.

सहकारनगर, बिबवेवाडीमध्ये गाडी रजिस्टर असलेल्या वाहनचालकांनी सर्वाधिक वेळा वाहतूक नियमभंग केल्याचे वाहतूक पोलिसांच्या टॉप १०० यादीतून दिसून येत आहे. सर्वाधिक १०८ वेळा नियमभंग करताना सीसीटीव्हीमध्ये कैद झालेल्या या वाहनचालकाने त्याविषयी सांगितले की, आपण व आपले वडील ही दुचाकी चालवितो. वाहतूक पोलिसांनी आपल्याला फोन करून याची माहिती दिल्यावर आपण ऑनलाइन ही दंडाची रक्कम भरली. सहकारनगर वाहतूक विभागाकडून सर्वाधिक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांकडून दंड वसुली केली आहे.

### माननीयावर ४० हजारांचा दंड

पर्वती भागातील एका माननीयांच्या आलिशान गाडीवर ४० हजार रुपयांचा दंड झाला आहे. द्रुतगती महामार्गावर अतिवेगाने जाणाऱ्या वाहनांवर स्पीडगनद्वारे कारवाई केली जाते. स्पीडगनद्वारे केलेल्या कारवाईतील या माननीयांच्या आलिशान कारचा समावेश आहे. मुंबईला जाताना या गाडीने अनेकदा पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील वेगाची मर्यादा ओलांडल्यामुळे केसेस करण्यात आल्या आहेत. वाहन ज्या वाहतूक पोलीस शाखेच्या हद्दीत रजिस्टर झाले आहे, त्यांच्याकडे या दंडवसुलीची कारवाई करण्यासाठी सूचना पाठविण्यात येते. त्यानुसार सहकारनगर वाहतूक शाखेकडे याची माहिती आली आहे. त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

लोकमत – दि. १ फेब्रुवारी, २०२०

# घरफोडी करणारा पोलिसांच्या जाळ्यात

**पुणे :** घरफोडी करणाऱ्या एका व्यक्तीस एरंडवण्यात सापळा रचून अलंकार पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून ९ लाख २० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. बापू रोहिदास कांबळे (वय ४३, रा. कोथरुड) असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. पोलीस नाईक लांडगे, पोलीस शिपाई राऊत आणि पोलीस शिपाई बडगे यांना रोहिदास एरंडवण्यात एका हॉस्पिटलजवळ आला असल्याची माहिती खबऱ्यामार्फत मिळाली होती. आरोपीकडून गुन्ह्यात चोरलेले ७ लाख ५० हजार रुपये किमतीची सोन्याची बिस्किटे एकूण ३०० ग्रॅम वजनाचे १ लाख ७० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ९ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

सकाळ – दि. १९ फेब्रुवारी, २०२०



हडपसर : अवजड वाहनांना प्रवेश बंदी असतानाही नियम न पाळणाऱ्या वाहनांवर वाहतूक विभागाकडून कारवाई करण्यात येत आहे.

# अवजड वाहनांवर कारवाई

## हडपसर वाहतूक पोलिसांकडून विशेष मोहीम ; सव्वालाखांचा दंड वसूल

**हडपसर, ता. १८ :** ''येथील प्रमुख रस्त्यावर विशिष्ट वेळांमध्ये माल वाहतूक करणारे ट्रक, तसेच अवजड वाहनांना बंदी आहे. मात्र, तरीही या रस्त्यांवर सर्रास अवजड वाहने येतात. त्यामुळे या वाहनांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून विशेष मोहीम हाती घेतली आहे. वाहनचालकांनी बंदी घातलेल्या रस्त्यांवर जड वाहने आणू नयेत,'' असे आवाहन हडपसर वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक राजेंद्र जाधव यांनी केले आहे.

**अवजड वाहनांवर कारवाई केल्यामुळे महिनाभरात एकही अपघात झाला नाही, तसेच वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत झाली आहे. शहरातील मध्यभागाच्या तुलनेत उपनगरात जड वाहतुकीचे प्रमाण जास्त आहे.**

**– गजानन भोसले,** सहायक पोलिस उपनिरीक्षक

''परिसरात डंपर, टिप्पर अशा अवजड वाहनांची धोकादायक पद्धतीने वाहतूक सुरू असते. जड वाहनांना सकाळी ७ ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते रात्री ९ यावेळेत बंदी घालण्यात आली आहे. तरीही काही वाहने नियम धाब्यावर बसवून या मार्गावर प्रवेश करतात. त्यामुळे वाहतूक शाखेने मागील १५ दिवसांत १०७ जड वाहनांवर कारवाई केली. या वाहन चालकांकडून एक लाख २३ हजार ७०० रुपये दंड वसूल केला आहे, तसेच नियमितपणे ही कारवाई केली जाणार,'' असल्याची माहिती जाधव यांनी दिली.

नागरिक सविता भामे म्हणाल्या, ''बेदरकारपणे ट्रक चालविणाऱ्या चालकांनी वेगमर्यादा पाळणे गरजेचे असून क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक केल्यास अपघाताची शक्यता असते. या पुढील काळात सातत्याने नियमभंग करणाऱ्या जड वाहनांवर कारवाई करण्याची आवश्यकता आहे.''

# नोबेल हॉस्पिटल बॉम्बने उडवण्याची धमकी देणारा सायबर सेलच्या 'जाळ्यात'

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २६ -** नोबेल हॉस्पिटल बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे देऊन १० लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या उच्चशिक्षित तरुणाला पोलसांच्या सायबर सेलने जेरबंद केले. हा तरुण उच्चशिक्षित असून बेरोजगारीला कंटाळून त्याने हे कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.




**बेरोजगारीला कंटाळून १० लाखांच्या खंडणीसाठी कृत्य**

प्रवीण कुंभार (३१, रा. भेकराईनगर, मूळ-झारगडवाडी, बारामती) असे जेरबंद केलेल्याचे नाव आहे. प्रवीण याने एम.एससी. फिजिक्सचे शिक्षण घेतले आहे. मागील काही महिन्यांपासून नोकरी नसल्यामुळे तो नैराश्यात होता. त्यामुळे पैसे मिळवण्यासाठी हॉस्पिटल उडवून देण्याचा मेल पाठवला. खंडणी न मिळाल्यास हॉस्पिटल बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिल्याने हॉस्पिटलसह रुग्णांमध्ये भीतीचे वातावरण होते. या प्रकरणाचा सायबर विभागाने तपास केला असता, संबंधित मेल गोव्यातून केल्याचे निष्पन्न झाले. सायबर विभागाने प्रवीणला वाईतून ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. ही कामगिरी पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सायबर पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, पोलीस उपनिरीक्षक किरण औटे, शिरीष गावडे, प्रवीणसिंग राजपूत, संतोष जाधव, प्रसाद पोतदार यांच्या पथकाने केली. प्रवीणचे लग्न झाले असून त्याने वडिलांकडून पैसे घेतले होते. त्यानंतर गोव्यातून प्रवीणने इंटरनेटची सातस्तरीय सुरक्षा भेदून बनावट मेल-आयडी तयार करत खंडणीसाठी ई-मेल पाठवल्याचे निष्पन्न झाले.

# ज्वेलर्सवर दरोडा टाकण्याच्या तयारीतील टोळी नऱ्हेत जेरबंद

पुणे, दि. २३ (प्रतिनिधी) – नऱ्हे परिसरातील ज्वेलर्सवर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सातजणांच्या टोळीला सिंहगड पोलिसांनी जेरबंद केले. त्यांच्याकडून तीन कोयते, मीरचीपूड, कटावणी, स्क्रू ड्रायव्हर जप्त करण्यात आले. ही कारवाई काल पहाटे सव्वातीन वाजण्याच्या सुमारास ग्रँडियर सोसायटीसमोर करण्यात आली.

सागर बसवराज नडगिरे (वय १९, रा. वडगाव बुद्रुक), राहुल गंगाराम मरगळे (वय १९, रा. शिरकुले, हवेली), शुभम सचिन उफाळे (वय २०, रा. वडगाव), समीर मोहन चांदेकर (वय २०, रा. धायरी), सागर शरनम रणसौरे (वय २०, रा. धायरी), हर्षद गणेश जातेगावकर (वय २१, रा. धायरी), शुभम सुनील चव्हाणे (वय २१, रा. आंबेगाव) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस शिपाई दयानंद तेलंगे पाटील यांनी फिर्याद दिली आहे.

सिंहगड पोलीस काल मध्यरात्री तीन वाजण्याच्या सुमारास नऱ्हे परिसरात पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी ग्रँडियर सोसायटीसमोरील रस्त्यावर सातजणांचे टोळके संशयास्पद फिरत असल्याचे पोलिसांना दिसले. पोलिसांनी सागर, राहुल, शुभम, समीर, रणसौरे, हर्षद, चव्हाणला ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे तीन कोयते, मिरचीपूड, कटावणी, दोर, बॅटरी, स्क्रू ड्रायव्हर असे साहित्य आढळले. चौकशीत त्यांनी नऱ्हे परिसरातील ज्वेलर्सवर दरोडा घालणार असल्याची कबुली दिली. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक चेतन थोरबोले अधिक तपास करीत आहेत.

# पिस्तूल बाळगणाऱ्या तरुणाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क



धनकवडी : बेकायदा गावठी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या सागर कृष्णा जाधव (वय ३०, राहणार सरगम चाळ बिबवेवाडी) यास भारती विद्यापीठ पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून एक गावठी बनावटीचे पिस्तूल व चार जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी शिवजयंती निमित्ताने पेट्रोलिंग करत असताना पोलीस कर्मचारी अभिजित जाधव व महेश मंडलिक यांना मिळालेल्या माहितीवरुन सागर जाधव यास ताब्यात घेऊन त्याच्या विरुद्ध आर्म ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग डॉ. संजय शिंदे, शिरीष सरदेशपांडे, सर्जेराव बाबर, विष्णू ताम्हाणे, भूषण कोते, कृष्णा बडे, गणेश चिंचकर, अभिजित रत्नपारखी, कुंदन शिंदे, सरफराज देशमुख यांनी केली.

**पुढारी** – दि. १२ जानेवारी, २०२०

## घरफोड्या करणारा सराईत अटकेत

**पुणे:** शहरात घरफोड्या आणि चोऱ्या करण्यात तरबेज शब्बीर बल्लारी (वय १९, रा. कोंढवा) याला कोंढवा पोलिसांनी अटक केली. या प्रकरणी आणखी दोन विधिसंघर्षित बालकांनादेखील पोलिसांनी ताब्यात घेतले असून, १३ हजारांची रोकड व सोन्याचे मंगळसूत्र असा ३४ हजारांचा किमती ऐवज त्यांच्याकडून हस्तगत केला. बल्लारी हा विधिसंघर्षित बालकांच्या मदतीने घरफोड्या करत असल्याची कबुली त्याने पोलिसांना दिली.

वाढत्या चोरीच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारांचा प्रतिबंध करण्यासाठी कोंढवा पोलिसांचे एक पथक गस्तीवर होते. त्या वेळी कर्मचारी पृथ्वीराज पाडुळे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली होती की, घरफोडीच्या गुन्ह्यातील काही आरोपी कोंढवा पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणार आहेत. त्यानुसार सापळा लावण्यात आला होता. दरम्यान दोन मुले संशयास्पद हालचाली करताना दिसून आली. त्यांच्याकडे विचारपूस करत असताना त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता गुन्हे केल्याची कबुली त्यांनी दिली. ही कामगिरी अपर पोलिस आयुक्त सुनील फुलारी, उपायुक्त सुहास बावचे यांच्या मार्गदर्शनात कोंढवा पोलिसांनी केली.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. १२ फेब्रुवारी, २०२०

# खंडणी मागितल्यावरून वडील-मुलाला अटक

**म. टा. प्रतिनिधी, येरवडा**

येरवडा परिसरात रस्तादुरुस्तीचे काम करणाऱ्या ठेकेदाराला 'वर्क ऑर्डर'ची मागणी करून, दोन लाखांची खंडणी मागितल्याचा प्रकार घडला आहे. खंडणी न दिल्यास कुऱ्हाडीने जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या तीन जणांना पोलिसांनी सोमवारी मध्यरात्री अटक केली असून, यात वडील आणि मुलाचा समावेश आहे.

सागर आदिनाथ हनुमंते (वय २५), आदिनाथ राजेंद्र हनुमंते (५४) आणि ऋषभ बाबा पिसे (२१, सर्व. रा. आर. के. चौक, लक्ष्मीनगर, येरवडा) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. आरोपींचा एक साथीदार फरार आहे. या प्रकरणी उत्तम राजेंद्र वडवराव (३४, रा. येरवडा) याने फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी ठेकेदार असून, पालिकेची विविध विकासकामे करण्याचे कंत्राट घेतात. येरवडा 'प्रभाग सहा'मध्ये सेवक चौक ते आर. के. पूरम चौक आणि सेवक चौक ते दक्षिणमुखी मंदिर रस्ता दुरुस्त करण्याचे टेंडर त्यांना मिळाले आहे. ठेकेदाराकडून गेल्या आठवड्यात कामाला सुरुवात केली असता सागर आणि आदिनाथ हनुमंते यांनी जागेवर येऊन 'वर्क ऑर्डर'ची मागणी केली. पैसे दिल्याशिवाय काम करायचे नाही, अशी धमकी देऊन, रस्त्याचे काम बंद पाडले. त्यामुळे ठेकेदाराने आरोपींच्या मोबाइलवर 'वर्क ऑर्डर'ची प्रत पाठवली; पण त्यानंतरही पैशांची मागणी करून ते दोघे त्रास देऊ लागले. सोमवारी रात्री ठेकेदाराकडून काम चालू असताना आरोपी पुन्हा जागेवर येऊन शिवीगाळ करून गोंधळ घालू लागले. पैसे न देता काम केल्यास कुऱ्हाडीने डोक्यात वार करून जीवे मारण्याची धमकी ठेकेदार आणि जेसीबी चालकाला दिली. त्यामुळे एकाने तातडीने पोलिस नियंत्रण कक्षाकडे तक्रार केली.

येरवडातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनूस शेख, पोलिस निरीक्षक अजय वाघमारे, सहायक निरीक्षक बलभीम ननावरे, समीर करपे, कर्मचारी हनुमंत जाधव, तेजस पवार, गोकुळ बोरकर आदींनी तिन्ही आरोपींना अटक केली. आरोपी सागर हनुमंते याच्यावर बाटली बंद पाण्याची वाहतूक करणाऱ्या ठेकेदाराला धमकावून पैशाची मागणी केल्याप्रकरणी तीन वर्षांपूर्वीदेखील खंडणीचा गुन्हा दाखल झाला होता.

# मौजमजेसाठी दुचाकी चोरणाऱ्यास अटक

**पुणे** : मौजमजा करण्यासाठी शहरातील विविध भागातून मागील सहा महिन्यांत २५ दुचाकी चोरणाऱ्या चौघांना हडपसर पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्यामध्ये एकजण व्यावयायिक नर्तक (प्रोफेशनल डान्सर) असल्याचे तपासात समोर आले आहे. संजय हरिष भोसले उर्फ सोन्या (वय-२०, मूळ-उस्मानाबाद), ऋषीकेश बाबासाहेब डोंगरे ऊर्फ बिट्टू (वय-१९, मूळ-लातूर), अभिषेक अनिल भंडगे ऊर्फ मोनु (वय-१९, मूळ-चिंचोली लातूर), अजित कैलास कांबळे ऊर्फ विठ्ठल (वय-२१, सर्व सध्या रा. शेवाळवाडी ) अशी अटक करण्यात आलेल्या चौघांची नावे आहेत.

पोलिसांनी त्यांच्याकडून १२ लाख २० हजारांच्या २५ दुचाकी जप्त केल्या आहेत. आरोपींनी अशाच प्रकारे आणखी काही दुचाकी चोरल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. अटक करण्यात आलेल्यांपैकी अभिषेक अनिल भंडगे ऊर्फ मोनु हा तरुण व्यावसायिक नर्तक असल्याचे समोर आले आहे. त्याने अनेक ठिकाणी मंचावर कार्यक्रम केले आहेत. तसेच, काही माहितीपटांमध्येही काम केले आहे.

हडपसर पोलिसांचे पथक मगरपट्टा परिसरात गस्त घालत असताना, चौघेजण मगरपट्टा चौकात काही वाहनांची संशयास्पदरीत्या पाहणी करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांनी सापळा रचून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी पुणे शहर व ग्रामीणसह लातूर येथून दुचाकी चोरल्याचे सांगितले. तसेच, ग्रामीण भागात याची विक्री करण्याची आरोपींची तयारी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपींविरोधात हडपसर येथे ११, वानवडी, कोंढवा, सिंहगड, सहकारनगर, मार्केटयार्ड, येरवडा, शिवाजीनगर, लोणीकंद, लोणी काळभोर, यवत आणि लातूर येथे प्रत्येकी एक गुन्हा दाखल असल्याचे तपासात समोर आला आहे.

लोकमत – दि. २८ फेब्रुवारी, २०२०

# पेट्रोलमध्ये भेसळ; ४० वर्षांनी अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कामगार म्हणून त्या वेळी काम करताना पेट्रोलमध्ये भेसळ करणाऱ्या विद्यमान 'सरपंचाला' अखेर पोलिसांनी अटक केली आहे. आता त्या व्यक्तीचे वय ६१ इतके आहे. आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांची रवानगी पोलीस कोठडीत केली.

विजय मुगुटराव गरुड (वय ६१, रा. भाबवडे, पो. न्हावी, ता. भोर) असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. कात्रज परिसरातील लडकत पेट्रोल पंपावर १९८० साली विजय गरुड हा कामगार म्हणून काम करत होता. या वेळी तो १९ वर्षांचा होता. या वेळी, अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईत पेट्रोलमध्ये भेसळ केल्याचे निदर्शनास आले होते. याप्रकरणी, पेट्रोलपंपाचे मालक बाळासाहेब लडकत यांच्यासह विजय गरुड व अन्य एका कामगाराविरोधात जीवनावश्यक वस्तू कायदा कलम ७ नुसार गुन्हा दाखल केला होता. यादरम्यान, लडकत यांचा मृत्यू झाला असून गरुड व अन्य एक जण होते. गरुड याविरुद्ध न्यायालयाने चार ते पाच वेळा अजामीनपात्र वॉरंट काढले होते. मात्र, तो न्यायालयात हजर झाला नाही. तसेच, त्याने जाणीवपूर्वक चुकीचा पत्ता दिल्याने पोलिसांना त्यापर्यंत पोहोचण्यात अडचणी येत होत्या. अखेर, बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरुन राजगड पोलिसांच्या मदतीने तब्बल ४० वर्षांनंतर गरुड याला स्वारगेट पोलिसांनी अटक केली. न्यायालयीन कोठडीनंतर त्यांना जामीन मंजूर झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## वयाच्या पुराव्यांची मागणी केली अन् उघड झाला गुन्हा



विजय गरुड हा भोर तालुक्यातील भाबवडे गावी असून, तो सरपंच असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक (गुन्हे) शब्बीर सय्यद यांच्या नेतृत्वाखालील हवालदार आर. पी. अर्जुन, विजय आवटे, शिपाई सुहास चिरमे यांचे पथक गावात दाखल झाले. या वेळी, गरुड याला ताब्यात घेत त्याच्याकडे चौकशी करण्यात आली. याने आपले वय ५० वर्षे असे सांगितले. त्याबद्दल संशय आल्याने पोलिसांनी त्याच्याकडे वयाच्या पुराव्यांची मागणी केली. ओळखपत्रांची पाहणी केली असता तो ६१ वर्षांचा असून १९८० साली तो पेट्रोल पंपावर कामास होता, याची खात्री झाल्यानंतर त्याला अटक करत न्यायालयात हजर करण्यात आले.